महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सर्व्हे नं - १३०/९ - ११, मोहननगर, चिंचवड, पुणे – १९ .
कार्यालय दुरध्वनी क्र.-०२०-२७४६२४८६, ०२०-२७४६२५१४.
ई-मेल- mschinchwad.esis@gmail.com

जा.क्र. राकाविवो/रुग्णा/मो.नगर/ICU/AMC/ 6359 /२०२६ दि. - 02 SEP 2026

विषय : महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर वैद्यकीय अधीक्षक, रा.का.वि. सोसायटी, रुग्णालय, मोहननगर, चिंचवड, पुणे येथील अतिदक्षता विभागातील सर्वसमावेशक देखभाल (**Turnkey Maintenance**) करण्यासाठी वार्षीक देखभाल करारासाठी (**AMC**) दरपत्रके मागविण्यासाठी जाहिरात अपलोड करणेबाबत.

१. वैद्यकीय अधीक्षक, राज्य कामगार विमा योजना, रुग्णालय, मोहननगर, चिंचवड, पुणे येथील १० खाटांच्या अतिदक्षता विभाग दि.०१/०७/२०२५ रोजी पासून कार्यान्वीत असून एक वर्षाचा कालावधी झालेला असल्याने सर्वसमावेशक देखभालीच्या (**Turnkey Maintenance**) अखंड सुरक्षेसाठी वार्षीक देखभाल करार (**AMC**) करण्यासाठी दरपत्रके मागविण्यासाठी जाहिरात अपलोड करणेबाबत. सदर निविदा संदर्भात अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

२. अधिकृत अतिदक्षता विभागातील सर्वसमावेशक देखभाल करण्याचा अनुभव असलेल्या व्यवसायिकाने अतिदक्षता विभागाची प्रत्यक्ष पहाणी करुन वार्षीक देखभाल कराराचे दरपत्रक **दि.०२/०९/२०२६ ते दि.११/०९/२०२६** या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत पोहचतील अशा मोहरबंद पाकिटात पाठवाव्यात. दर पत्रकांचे स्वतंत्र पाकीट व आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे (अनुभवाचे) पाकीट दोन्हींचे एक पाकीट तयार करुन सिलबंद पाकीटात भरुन पाठवाव्यात. विहित वेळेतील प्राप्त निविदा/दरपत्रके **दि.१५/०९/२०२६** रोजी दुपारी २.३० वाजता वैद्यकीय अधिक्षक यांच्या दालनात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा/दरपत्रके उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवाणगी आहे. सदर निविदाधारक हजर न राहील्यास त्याच्या गैरहजेरी मध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल. याबाबत निविदाधारकचे कोणतेही आक्षेप असल्यास ते मान्य करण्यात येणार नाही. तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार वैद्यकीय अधीक्षक राज्य कामगार विमा योजना, रुग्णालय मोहननगर, चिंचवड, पुणे यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

(सोबत (सोबत वार्षीक देखभाल कराराच्या अटी व शर्ती जोडण्यात आलेल्या आहेत).

Digitally signed by
Varsha Manoj Supe
Date: 02-09-2026
15:26:18

अध्यक्ष तथा वैद्यकीय अधीक्षक
निर्लेखन समिती
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय,
राज्य कामगार विमा योजना, मोहननगर,चिंचवड, पुणे १९.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सर्व्हे नं - १३०/९ - ११, मोहननगर, चिंचवड, पुणे – १९ .
कार्यालय दुरध्वनी क्र.-०२०-२७४६२४८६, ०२०-२७४६२५१४.
ई-मेल- mschinchwad.esis@gmail.com

निविदा संदर्भातील अटी व शर्ती

१. मोहरबंद पाकिटात वार्षीक देखभाल कराराचे दरपत्रक/ निविदा **दि.०२/०९/२०२६ ते दि.११/०९/२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत** (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना, मोहननगर,चिंचवड, पुणे १९ येथे सादर करावी.

२. या रुग्णालयातील १० खाटांच्या अतिदक्षता विभागातील सर्वसमावेशक देखभालीच्या **(Turnkey Maintenance Basis)** अखंड सुरक्षेसाठी वार्षीक देखभाल करार **(AMC)** करावयाचा आहे. सदर सर्वसमावेशक देखभाल करार करण्यास इच्छुक असलेल्या व्यवसायीकाने प्रत्यक्ष या रुग्णालयातील अतिदक्षता विभाग पाहाण्यासाठी **दि.०७/०९/२०२६ ते ०९/०९/२०२६** पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत यावे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही दिवशी पाहता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

३. रुग्णालयातील अतिदक्षता विभाग हा रुग्णांचे प्राण वाचवणारा अत्यंत महत्वाचा विभाग असून तेथील वैद्यकीय उपकरणे २४ तास अखंड कार्यान्वीत असणे गरजेचे आहे त्यासाठी अतिदक्षता विभगातील **बायोमेडीकल उपकरणे, मेडीकल गॅस पाईप लाईन, इन्फ्रास्ट्रक्चर व पॅनेलिंग तसेच HAVC आणि एअर फिल्टरेशन तसेच आंतरराष्ट्रीय मानकांनूसार उपकरणांचे अचूक कॅलिब्रेशन करणे** व नियमीत तपासणी करणे इत्यादी.

४. ज्यांना रजिस्टर पोष्टाने निविदा पाठवायची आहे. त्यांनी **दिनांक ११/०९/२०२६** पर्यंत सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने पाठवावी. अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

५. अनामत रक्कम रु.१००,०००/- (रुपये एक लाख फक्त) रक्कमेचा ADMN OFFICER, ESIS HOSPITAL MOHANNAGAR. A/C NO.१०१४६१३०८७० या नावाने डिमांड ड्राप्ट अथवा रोखीने कार्यालयातील रोखपाल यांच्याकडे जमा करावे. व **अनामत रक्कम भरलेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

६. दर पत्रकांचे स्वतंत्र पाकीट व आवश्यक असलेले कागदपत्रांचे स्वतंत्र पाकीट असे दोन्ही पाकीटे सिलबंद एका पाकिटात भरुन पाठवाव्यात.(**Technical and Financial** ची वेगवेगळी पाकीटे एकाच पाकीटात घालावीत).

७. ज्या निवीदाधारकांनी अनामत रक्कम भरलेली आहे. परंतू ज्यांची निविदा बाद झाली असल्यास त्यांची अनामत रक्कम परत केली जाईल.

८. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

९. निविदा पाकीटावर निविदाधारकाने आपले संपूर्ण नाव व पत्ता मोबाईल नंबर नमुद करावा. तसेच कोणकोणत्या कारणासाठी निविदा सादर करत आहे ते पाकीटावर नमूद करावे.

१०. यशस्वी निविदाधारकास, निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून दहा दिवसांच्या आत देखभालीचे कामकाज सुरु करावे. अन्यथा त्यांची निविदा रद्द बातल ठरविली जाईल व अनामत रक्कम जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल.

११. तसेच यशस्वी निविदाधारक अटी व शर्ती नुसार देखभालीचे काम करत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे बरोबर केलेला करार रद्द करुन त्यांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. वार्षीक देखभाल करार झालेनंतर कामात हालगरजीपणा अथवा विलंब झाल्यास नियमानूसार कार्यवाही करण्यात येईल तसेच दंड आकरण्यात येईल.

१२. जर अतिदक्षता विभागाचे वार्षीक देखभाल करार दरपत्रक आपेक्षीत किंमती पेक्षा जास्त आल्यास निविदा नामंजूर करणे, स्थगीती देणे तेसच कोणतीही पुर्व सुचना न देता निविदा रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांनी राखून ठेवले आहेत.

१३. प्रशासकीय किंवा तांत्रीक कारणास्तव वरील निविदा सादर करावायाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

१४. पॅनकार्ड/ जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र/इनकमटॅक्स रिटर्ण मागील तीन वर्षाचा/ संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र/संस्थेच्या सचिवाचे सहमती पत्र/ आधार कार्ड/कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र तसेच यापुर्वी अतिदक्षता विभागाचे काम केले असल्यास रुग्णालयाचे प्रमाणपत्र इत्यादी दस्तऐंवज असणे बंधनकारक आहे. सदर दस्तऐवज बंद पाकिटामध्ये सादर करावे.

१५. दर पत्रकावर निविदाधारकाची स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे. स्वाक्षरी नसल्यास दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

Digitally signed by
Varsha Manoj Supe
Date: 02-09-2026
15:08:51

अध्यक्ष तथा वैद्यकीय अधीक्षक
निर्लेखन समिती
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय,
राज्य कामगार विमा योजना,
मोहननगर,चिंचवड, पुणे १९.